


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०१ ● अंक : ३०५ ● रविवार, दि. ०१ सप्टेंबर २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर/६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 305 ● Sunday, 1 September 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-

## महाविकासआघाडीचे आज जोडे मारा आंदोलन

- गेटवे पर्यटकांसाठी बंद
- हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया परिसराला छावणीचे स्वरुप

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
सिंधुदुर्गातील मालवण परिसरातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. यामुळे शिवप्रेमी संताप व्यक्त करत आहेत. तर दुसरीकडे या प्रकरणावरून विरोधकही आक्रमक झाले आहे. महाविकासआघाडीतर्फे आज सरकारला जोडे मारा आंदोलन केले जाणार आहे. आज रविवारी 1 सप्टेंबर रोजी महाविकासआघाडी सरकारतर्फे हे 'जोडे मारा' आंदोलन केले जाईल. गेट वे ऑफ इंडिया येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाजवळ हे आंदोलन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया परिसरात पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. महाविकासाघाडीतर्फे आज जोडे मारा आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे शरद पवार आणि काँग्रेसचे नाना पटोले यांसह महाविकासआघाडीतील अनेक दिग्गज नेते सहभागी होणार आहे. राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आठ महिन्यांत कोसळल्याने राज्यभरातील शिवप्रेमी दुखावले आहेत. या प्रकरणी महायुती सरकारचा निषेध करण्यासाठी महाविकासआघाडीच्या नेत्यांनी या आंदोलनाची हाक दिली आहे.











# दुर्घटना की घातपात ?



छत्रपती शिवाजी महाराजांचा विषय महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. देवा प्रमाणेच लोक त्यांची पूजा करतात. आणि जर कुणी त्यांचा अवमान करण्याची चूक केली, तर मराठी माणूस कधीच ते खपवून घेत नाही. याच गोष्टीचा फायदा, विधानसभेआधी घेतला जात आहे आणि जाणीवपूर्वक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भाजप सरकारने अपमान केला असे 'narrative' पसरवण्यास सुरवात केली गेली आहे. राज्यातील मालवणच्या घटनेवरून राजकीय वातावरण निर्मिती झाली असतानाच, असेच काम पिंपरी-चिंचवडमध्ये उभारल्या जाणाऱ्या जगातील सर्वांच उंच छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याविषयी अफवा पसरवण्यात आली. ज्या पुतळ्याचे काम अजून चालू ही झाले नाही, अशा पुतळ्याला भेगा पडल्या असे खोटे narrative चालवून छत्रपती संभाजी महाराज प्रेमींमध्ये संतापाची लाट पसरविण्याचा प्रयत्न केला गेला. ''बोऱ्हाडेवाडी मोशी प्रदर्शन जागा येथे पिंपरी चिंचवड महापालिका सुमारे 100 कोटी रुपये खर्च करून छत्रपती संभाजी महाराज यांचा 100 फुटी उभा करत असलेल्या पुतळ्यास पायातील (मोजडी) ला भेगा पडल्याने सर्वत्र खळबळ माजली आहे. मालवण येथील पुतळ्यानंतर बोऱ्हाडेवाडी येथील हे पुतळा प्रकरण राज्यभर गाजणार असून छत्रपती संभाजी महाराज प्रेमींमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे.''

या खोट्या व्हायरल मेसेजनंतर हा मुद्दा एवढा पेटला आणि परिस्थिती एवढी बिकट झाली की, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पुढे येऊन हा मेसेज खोटा आहे जाहीर करावे लागले.ी खरंच खूप गंभीर बाब आहे. जाणूनबुजून महाराष्ट्राचे दैवत असलेल्या शिवरायांचा अवमान करण्याची वृत्ती ही सध्याच्या सरकारच्या अंगी आहे असं भासवून, लोकांच्या मनामध्ये महायुतीविषयी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष सध्या करत आहेत.

राजकोटवरील घटनेमध्ये सुद्धा कोणाचा हात होता का? सिंधुदुर्गातील मालवण परिसरात असलेल्या राजकोट किल्ल्यावर आठ महिन्यांपूर्वीच उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. आणि त्या नंतरच राज्यातील राजकारण चांगलंच तापायला सुरवात झाली. विरोधकांकडून राज्य सरकारवर टीका करण्यात येत आहे. अशातच भाजप नेते आणि माजी खासदार निलेश राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आमदाराविषयी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. शिवरायांचा पुतळा पडण्यामागे वैभव नाईक यांचा हात तर नाही ना? असा सवाल निलेश राणेंनी विचारला आहे. दुर्घटनास्थळी नाईक 15 मिनिटात कसे काय पोहोचले? असं निलेश राणे यांनी विचारलं आहे.

कोण आहे हा वैभव नाईक? आजूबाजूला कसलाही नियोजित कार्यक्रम नसताना आणि राहतं घर हे कणकवली शहरामध्ये जे 50 किलोमीटर लांब आहे, असं असताना घटनास्थळी पंधरा मिनिट आधी नाईक कसे पोहोचले ?

महाराष्ट्र मध्ये होणाऱ्या घटना बघता, शिवरायांचा पुतळा पडण्यामागे कुठले षडयंत्र आहे का? या बद्दल चोकशी झाली पाहिजे.

माहितीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाचे काम हे उबाठा सेनेचे वैभव नाइक यांच्या कार्यकर्त्यांना दिले होते. त्या सुशोभीकरणादरम्यान काही गडबड झाली नाही ना? याची चौकशी करण्याची गरज आहे. यावरुन लक्षात येत आहेत की, हे सर्व जाणूनबुजून महाराष्ट्र पेटवण्यासाठी केले जात आहे. काही दिवसांपूर्वी ममता बॅनर्जी यांनी धमकी दिली होती कि, जर बंगाल जळला, तर मी संपूर्ण भारत जळेल. याचा आताच्या गोष्टीशी काही संबंध तर नाही ना? मराठा आंदोलनामुळे महाराष्ट्र पेटला नाही, त्यामुळे तर या घटनेला घडवून महाराष्ट्र पेटवण्याचा प्रयत्न तर केला जात नाहीये ना? बरं हे तेच पक्ष आहेत ज्यांनी त्यांचे सरकार असताना (कमलनाथ) jcb च्या साह्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उखडून फेकून देण्यात आला होता. हे तेच आहेत जे अजूनही छत्रपती संभाजीनगर ला "औरंगाबाद" म्हणणे पसंत करतात. हे तेच आहेत ज्यांना असं वाटते कि अफझलखान आहे म्हणून शिवाजी महाराज आहेत. यांचा डीएनए तपासला तर त्यामध्ये मुघलाचे अंश सापडतील .जे आता शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून राजकारण करत आहेत, त्यांच्या मते तर 'छत्रपती शिवाजी महाराजांना 'जाणता राजा' म्हणण्याची आवश्यकता नाही'.





०१ सप्टेंबर
हॅट्रिक आमदार ..
खडकवासला मतदारसंघाचे विकासरत्न लोकप्रिय संयमी नेतृत्व ...
आमदारः खडकवासला विधानसभा मतदारसंघ,पुणे. (भाजपा)
मा. श्री. भीमरावअण्णा तापकीर
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
प्रतिक गंगणे
व्यवस्थापकीय संपादक दैनिक आरंभ पर्व
संपर्क : ७२७६३१४१४२

# आ. भीमराव तापकीर यांच्याकडून कोट्यवधी रुपयांची कामे पूर्णत्वास

## या भागातील जनता महायुतीला पुन्हा संधी देईल : रुपेश घुले पाटील

**लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला व नांदेड गाव परिसर व भागात आमदार भीमराव अण्णा तापकीर यांचे योगदान निश्चित आहे.त्यांनी कोट्यवधी रुपयाची कामे या भागात केली आहेत.त्यामुळेच गेली अनेक दशकापासून मतदार त्यांच्या पाठीशी उभा आहे. असे मत भाजपा खडकवासला प्रभाग अध्यक्ष रुपेशजी घुले पाटील यांनी आरंभपर्व कडे व्यक्त केले.

इलेक्शन टॉक सदरामध्ये त्यांनी निवडणुकीच्या बाबतीत चर्चा केली. खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये आ.भीमराव अण्णा तापकीर यांनी त्यांच्या कामाने आपले स्थान मजबूत केले आहे. या भागातील मतदार हा भारतीय जनता पार्टी तसेच मित्रपक्ष यांच्याकडे पूर्वीपासून सहकार्य करतं आला आहे.

खडकवासला भागातील विकासात आमदार तापकीर यांचे योगदान आहे.

त्यामुळेच आगामी विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीचा उमेदवार विजयी होईल असे मला एक कार्यकर्ता म्हणुन ठामपणे वाटते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या महायुती सरकारने केलेल्या जनकल्याणाच्या अनेक योजनाचा प्रभाव ह्यां आगामी विधानसभेत नक्कीच दिसून येईल.

आमच्या नांदेड व नांदेड सिटी भागात अनेक विकासकामे झालीत.मी उपसरपंच असताना ड्रेनेज व इतर सर्व रस्त्याचे कॉंक्रेट करण व गावाचा झपाट्याने विकास करण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊनही पक्षाकडे व आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यामार्फत विकास कामे राबवण्यात आली.





अनेक शिबिरे मतदार नोंदणी लाडकी बहीण योजना फॉर्म भरून संकलित ऑफिसमध्ये चालू असते.

आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या सारखा शांत मनमिळावू लोकप्रतिनिधी होणे क्वचितच आहे.

पक्ष देईल त्याप्रमाणे जबाबदारीने काम करू. असे मतं घुले पाटील यांनी व्यक्त केले. खडकवासला मतदारसंघांमध्ये विधानसभेसाठी तुमची चर्चा सुरु असल्याचे सांगताच घुले पाटील यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला.

आगामी काळामध्ये आ. भीमराव अण्णा तापकीर व भारतीय जनता पार्टी यांचा मी कार्यकर्ता आहे. कार्यकर्ता म्हणूनच कार्य करणार आहे.

भविष्यात संधी मिळतील तोवर आपलं काम करतं संघटन व माणसे जोडत राहणे हेच कर्तव्य समजतो.*

### घुले पाटील मोठे राजकीय प्रस्थ

खडकवासला भाजप प्रभाग अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांचे घरी पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात पाटीलकी त्यांच्याकडे आली.पणजोबा एकनाथ घुले पाटील मुलखी पाटील म्हणून नांदेडगा चा कारभार पहात .आजोबा मार्तंड घुले पाटील सरपंच पोलीस पाटिल म्हणून कारभार पाहत होते व वडील आबासाहेब घुले पाटिल बिनविरोध 15 वर्षे नांदेडगाव चे उपसरपंच म्हणून काम करीत होते.त्यामुळे ह्यां भागात घुले पाटील यांची राजकीय प्रतिमा मोठी आहे. त्यांचा या भागावर चांगला प्रभाव आहे. ह्यामुळे भाजपाला फायदा नक्कीच होत आहे.











दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

# खडकवासला विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्याचा आ. भीमराव अण्णा तापकीर यांच्याकडून प्रयत्न

## भारतीय जनता युवा मोर्चा प. अध्यक्ष निखिल धावडे





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या पश्चिम विभागामध्ये आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी विकास करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. अनेक वर्ष रेंगाळलेली कामे त्यांनी पूर्ण केलीत .अधिक मोठ्या पद्धतीने विकास निधी दिला आहे. त्यामुळे आगामी काळातील जनता त्यांना म्हणजेच भाजपला साथ देईल असे मत भारतीय जनता युवा मोर्चाचे पश्चिम अध्यक्ष कोंढवे धावडे चे माजी उपसरपंच निखिल धावडे यांनी व्यक्त केले. आरंभपर्व इलेक्शन टॉक सदरामध्ये त्यांनी संवाद साधला त्यावेळी त्यांनी माहिती दिली. खडकवासला मतदारसंघांमध्ये अत्यंत जिव्हाळ्याचें प्रश्न सोडवण्यात आलेत. या भागाच्या विकासासाठी भीमराव अण्णांनी अंदाजे शेकडो कोटी निधी दिला आहे.शिवणे ते कोंढवे धावडे रस्ता साठी 10 कोटी रुपये देण्यात आले. ह्यां रस्त्याच्या कामामध्ये अण्णांनी विरोध जुगारून अतिक्रमण हटवले.व रस्त्याचे विस्तारीकरण केलं. कुरंजाई माता ब्रिज , सुदर्शन ब्रिजचे विस्तारीकरण करण्यात आले. आज या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दळणवळण होत आहे.

ऑक्सिजन पार्क, या भागातील नागरिकांसाठी मोफत अॅम्बुलन्स सेवा उपलब्ध करून दिली. कोंढवे धावडे या गावातील अनेक दुर्गम रस्त्याचे काँक्रिटीकरण आमदार निधीतून करण्यात आले. उपसरपंच असताना कोंडवे धावडे गावात आरोग्य शिबिरे रक्तदान शिबिरे,विविध योजनांसाठी सेवा शिबिरे घेण्यात आली.या गावाच्या प्रगतीसाठी आतापर्यंत अविरत प्रयत्न सुरु आहेत.जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यास मंत्री चंद्रकांत दादा पाटील व भीमराव अण्णा तापकीर उपस्थित होते. खडकवासला युवा मोर्चा अध्यक्ष झाल्यापासून भारतीय जनता पार्टीमध्ये युवा संघटन करण्याचे काम सुरु आहे. अनेक युवक भारतीय जनता पार्टीशी जोडण्याचा प्रयत्न सुरु आहे.निवडणुका असो नसो युवकांचे प्रश्न सोडवण्याला पहिले पूर्वीपासून आपण प्राधान्य देत आहोत. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये युवक मोठ्या संख्येने भाजपला निश्चितपणे सहकार्य करतील हा आत्मविश्वास आहे. तळापासून वरिष्ठांपर्यंत स्नेहभाव असलेले मोजके नेते आहेत त्यापैकी एक भीमराव तापकीर आहेत.त्यांच्या नम्रपणा व संयमीपणामुळे कितीही संकटे आली तरीही न डगमगता ते सामोरे जातात.आमच्यासारख्या युवा कार्यकर्त्यांना सातत्याने मार्गदर्शन करतात ही त्यांची खासियत सर्वत्र मतदारसंघात आहे. भविष्यातील राजकारणामध्ये पक्ष देईल ते जबाबदारी झपाटून काम करण्याचं धोरण आम्ही सर्व युवा कार्यकर्ते घेतं आहोत.

कॅबिनेट मंत्री चंद्रकांत दादा पाटील ,आमदार भीमराव अण्णा तापकीर, मतदार संघाचे अध्यक्ष सचिनभाऊ मोरे ,अध्यक्ष गणेश वरपे पाटील , ग्रामीण अध्यक्ष नवनाथभाऊ तागुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटनेचे काम करत आगामी विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या विजयासाठी जीवाचं रान करणार आहोत असेही निखिल धावडे यांनी शेवटी सांगितले.

### धावडे यांची वाटचाल

निखिल धावडे यांच्या कुटुंबामध्ये चुलते सुरेश दत्तात्रय धावडे सी एम ई चेअरमन होते.मात्र एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून कामाची सुरुवात केली. पुढे गावकऱ्यांनी विश्वास टाकून त्यांना ग्रामपंचायतीमध्ये सदस्य पदाची संधी दिली व गावच्या उपसरपंच पदी त्यांची निवड झाली. त्यातून पुढे भारतीय जनता पार्टीचे कार्य करत आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यासोबत ह्यां भागाच्या विकासासाठी कार्य सुरू ठेवले.2023 साली पक्षाने खडकवासला विधानसभा मतदारसंघातील पश्चिम विभागाच्या युवा मोर्चा अध्यक्षपदी निवड केली.केंद्रीय राज्य मंत्री मा श्री मुरलीधर मोहोळ शहराध्यक्ष घीरज घाटे आमदार भीमराव आण्णा तापकीर यांच्या हस्ते निवड पत्र देण्यात आले. उत्तम नगर शिवणे कोंढवे धावडे ह्यां भागात त्यांचे चांगले कार्य आहे. युवकांमध्ये त्यांची क्रेझ आहे.हाती घ्याल ते तडीस न्याल ह्यां धोरणांनी त्यांची कार्यपद्धती सर्वांनाच भावते.

# विकासासाठी कटिबद्ध तत्पर आमदार भीमराव अण्णा तापकीर : बापूसाहेब पोकळे

## आरंभपर्व इलेक्शन टॉक खडकवासला विधानसभा मतदारसंघ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी व परिसराचा विकास हेच डोळ्यासमोर ठेवून मागील अनेक वर्षापासून धायरी परिसर प्रगतीपथावर आणण्याचे काम हे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी केले. त्यामुळे या भागातील मतदार त्यांच्या पाठीशी उभा राहणार असल्याचे मत खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी ईलेक्शन टॉक सदरामध्ये व्यक्त केले.

खडकवासला विधानसभेच्या निम्मित चर्चेमध्ये त्यांनी आरंभपर्वशी संवाद साधला. गेल्या अनेक वर्षापासून या भागातील विकास कामे खोळंबली होती. ही कामे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी पूर्ण केली.गावातील अंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ते,ड्रेनेज लाइन,मंदिरासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे धायरी व परिसरातील अनेक रस्त्याचे सुशोभीकरण आमदार भीमराव तापकीर यांच्या निधीतून करण्यात आले आहे. आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यासारखा संयमी व शांत व्यक्तिमत्त्वाला पुन्हा संधी मिळावी. अशी आमच्यासारख्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यांना भविष्यामध्ये मंत्री पदाची ही संधी मिळू शकते.ते भाग्य ह्यां भागातील मतदारांना मिळेल असा विश्वास वाटतं असल्याचेही त्यांनी सांगितले. असे बापूसाहेब पोकळे यांनी म्हटलं आहे. दरम्यान बापूसाहेब पोकळे यांच्या घराण्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात पोलीस पाटीलकीचा मान मिळाला आहे. त्यांचे आजोबा हे तत्कालीन धायरी गावचे पोलीस पाटील होते. सध्या बापूसाहेब पोकळे हे या भागात भाजपाचे कार्य करत असून सध्या ते खडकवासला विधानसभा सरचिटणीस म्हणून कार्य करत आहेत. त्यांचे बंधू पै.तुषार पोकळे पाटील हे 42 प्रभाग अध्यक्ष म्हणून कार्य करत आहेत. धायरी व परिसरामध्ये आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यामार्फत विकास कामे करण्यासाठी पोकळे बंधू आग्रही असल्याचे वारंवार निदर्शनास येते. आगामी काळात धायरी परिसरातून आमदार भीमराव अण्णा तापकीर यांना मोठे मताधिक्य मिळणार असल्याची ग्वाहीही बापूसाहेब पोकळे यांनी दिली आहे.मात्र परिस्थितीनुसार एखादा निर्णय पक्षाने देईल त्या आदेशाप्रमाणे आम्ही कार्य करत राहू असेही त्यांनी शेवटी सांगितले.





### आतापर्यंतची लोकहिताची कामे

आमदार निधी मधून रस्ते,ड्रेनेज लाइन,रस्ता सुशोभीकरण करण्यात आले तसेच स्व खर्च मधून ३ वर्षात २५० ते ३०० सोसायटी ना १०,००० ते १२,००० मोफत टँकर वाटप केले.६००० महिला देवदर्शन,४००० लहान मुली महिला साठी वॉटर पार्क सहल,५००० लहान मुलांसाठी बालजत्रा,रामायण महाभारत ग्रंथ वाटप,जगन्नाथ रथ यात्रा ,हजारो रुग्णाना मोफत वैद्यकीय सेवा, नामांकित कीर्तनकार यांचे अनेक किर्तन सोहळे,विविध सामाजिक व आरोग्य शिबिर रक्तदान शिबिरे आयोजित केलीअसल्याचे बापूसाहेब पोकळे यांनी सांगितले.तसेच आगामी काळात धायरीचा विकास आराखडा,प्रमुख डीपी रस्ते,नवीन सुद्ध पाणी टाकी,ड्रेनेज लाइन,क्रीडांगण,उद्यान,नाट्यगृह,धायरीच्या सर्वांगीण विकासाकडे आपला कल असल्याचे त्यांनी सांगितले.












# कोणाचीही दादागिरी चालणार नाही : चंद्रकांतदादा पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'समाजात माहितीच्या अधिकार कायद्याच्या आधारे 'हे बंद करा, ते बंद करा' असे करायला लावणारे लोक आहेत. पुण्यात उभारलेले 'आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र' बंद होता कामा नये. कोणाचीही दादागिरी येथे चालणार नाही. कोणी त्रास दिला, तर आम्ही खमके बसलो आहोत. आम्ही चळवळीतून आलो आहोत. त्यामुळे 'हे कसे सुरू झाले, हे कोठून आले', 'हे कसे काय, ते कसे काय, याचे उत्तर द्या' हे चालणार नाही,' असे परखड मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनएसडीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन येथे उभारलेल्या 'आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्रा'चे उद्‌घाटन शनिवारी झाले. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, एनएसडीसी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष नितीन कपूर, सल्लागार मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप सिंग कौरा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पाटील म्हणाले, 'विदेशात नोकऱ्या मिळविण्याचे 'एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज म्हणून आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र उभारले आहे. यामध्ये राज्यातील तरुणांना विदेशात नोकरी करण्याची संधी हवी आहे. त्या पार्श्वभूमीवर विदेशात नोकरी मिळवून देण्यासाठी आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण आणि नोकरी मिळवून देण्यासाठी हे केंद्र कार्यरत असेल. युरोपसह अनेक देशात कौशल्याधारित काम करणाऱ्या मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. युवकांना परदेशात नोकरी आणि रोजगार देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे.'




